



दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • २३९ • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.५ जुलै २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# इंग्रजीचा आग्रह धरणाऱ्यांना पासपोर्ट व्हिसा काढून थेट ब्रिटनच्या संसदेत पाठवा

**मुंबई (वृत्तसंस्था)–महाराष्ट्रात हिंदी – मराठीच्या मुद्यावरून मोठे वादंग माजले आहे. या प्रकरणी सत्ताधारी व विरोधकांत राजकीय चिखलफेक झाली. त्यानंतर आज विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात विधानसभेत पुन्हा एकदा भाषेचा मुद्दा उपस्थित झाला. पण यावेळी भाषा होती ती म्हणजे इंग्रजी. या प्रकरणी सत्ताधारी भाजपचे आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी सभागृहाच्या इंग्रजी कार्यक्रम पत्रिकेवर तीव्र आक्षेप घेतला.त्याचे झाले असे की, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज प्रथम मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे असणाऱ्या ऊर्जा खात्याच्या कारभारावर तोंडसूख घेतले. त्यानंतर औचित्याचा मुद्दा उपस्थित करत कामकाजाची पत्रिका इंग्रजीत छापल्यावर तीव्र आक्षेप नोंदवला. महाराष्ट्र विधानसभा नियमांत कामकाज मराठी, हिंदी, इंग्रजीत चालेल अशी तरतूद नक्कीच आहे. पण साधारणपणे मीही १९९५ पासून या सभागृहात आहे. यापूर्वी आपली कार्यक्रम पत्रिका मी केव्हाच इंग्रजीत पाहिली नाही, असे ते म्हणाले. त्यावर समोरच्या बाकांवरून हे पहिल्यापासून आहे, असे उत्तर आले. त्यावर मुनगंटीवार यांनी त्यांनाच कडक शब्दांत सुनावले.**

## सुधीर मुनगंटीवार विधानसभेत पुन्हा भडकले

ते म्हणाले, ऐकूण तर घ्या ना. पहिल्यापासून आहे म्हणजे? सनदी अधिकाऱ्यांना आपण मराठी शिकवायला लावतो. इकडे मराठी अभिजात भाषा करायची व मराठी ज्यांना बोलता येत नाही, त्यांना हिंदीची संधी असताना जबरदस्तीने इंग्रजी वापरायला सांगायची. मग हिंदीत बोलावे. कार्यक्रमपत्रिका हिंदीत घ्यावी. हिंदीच्या सक्तीला विरोध करायचा आणि इंग्रजीवर प्रेम दाखवायचे. इंग्रजीला आलिंगन द्यायचे. हा माझा आक्षेप आहे.सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी नियमावलीतून इंग्रजी शब्द काढून टाकण्याचीही मागणी केली. महाराष्ट्र विधानसभा नियम तयार करताना इंग्रजीचा प्रभाव असेल. माझी विनंती आहे. एकदा नियम समितीची बैठक घ्या. इंग्रजी शब्द जिथे – जिथे असेल तो तिथून काढून टाकावा. मराठी शिकलीच पाहिजे. अभिजात भाषा आहे. समजा एखाद्याला खूप अडचण असेल तर हिंदी आहे. पण फारच इंग्रजीशिवाय समजत नसेल तर पासपोर्ट – व्हिसा काढून अशांना थेट ब्रिटनच्या संसदेत पाठवा. ही काय पद्धत आहे?, असे ते आपला संताप व्यक्त करताना म्हणाले.

सुधीर मुनगंटीवार यांच्या आक्षेपानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. सुधीरभाऊ, माध्यमांना हिंदी व मराठीवर लिहायला खूप काही आहे. आता तुम्ही त्यात इंग्रजीची भर घालू नका, असे ते म्हणाले. त्यांनी हे म्हणताच सभागृहात हास्याची लकेर उमटली. नियम २२ नुसार सभागृहात कोणत्या भाषेत चर्चा करता येते हे सर्वांना माहिती आहे. त्यानुसार आपण सुरुवातीपासून इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांमध्ये कामकाज पत्रिका तयार करतो. त्याशिवाय माझ्याकडे कामकाज पत्रिका इंग्रजीत देण्यात यावी अशी इतरही ८ सदस्यांची विनंतीही आली आहे, असे नार्वेकर म्हणाले.



# जिल्हाधिकारी विनय गौडा यांची तळोधी गावास भेट; कंपोस्ट प्रकल्पास दिली प्रशंसा

**तळोधी | प्रतिनिधी**

तळोधी (बा.) येथे आज चंद्रपूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांनी दौरा करून विविध विकासकामांची पाहणी केली. त्यांच्या या भेटीदरम्यान नागभीडचे तहसीलदार प्रताप वाघमारे, नायब तहसीलदार उमेश कावळे, पंचायत समिती नागभीडच्या गटविकास अधिकारी स्नेहलता लाड, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी शिला गेडाम, आरोग्य, महसूल, पोलीस आणि इतर विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या दौर्यात विशेषतः ग्रामपंचायतमार्फत उभारण्यात आलेल्या घनकचरा व्यवस्थापन आणि कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्पाची जिल्हाधिकाऱ्यांनी पाहणी केली. सन २०२१–२२ दरम्यान ७१ लाख रुपये निधी खर्चून उभारण्यात आलेल्या या



प्रकल्पामार्फत कंपोस्ट खत तयार करून स्थानिक बचत गटांच्या माध्यमातून नागरिकांना विक्रीस उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबवण्यात येत आहे. या अभिनव योजनेत जिल्हा परिषद आणि जिल्हा प्रशासनाच्या माध्यमातून मिळालेल्या सहकार्याबद्दल ग्रामपंचायतीचे उपसरपंच राजेश घिये यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले.जिल्हाधिकारी गौडा यांनी नवीन बांधकाम झालेल्या अंगणवाडी केंद्रास भेट देऊन त्यातील सुविधांची माहिती घेतली. यावेळी अंगणवाडी सेविका, आरोग्य विभागाचे कर्मचारी आणि स्थानिक पदाधिकारी उपस्थित होते. याशिवाय त्यांनी स्मशानभूमी परिसरात बांधण्यात आलेल्या घनकचरा संकलन केंद्राचीही पाहणी केली.गावातील विविध विभागांचे पदाधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, पत्रकार, बचत गटांचे प्रतिनिधी आणि ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते. दौर्याच्या निमित्ताने वृक्षारोपण उपक्रमही राबवण्यात आला, ज्यात पत्रकार संघ, ग्रामपंचायत सदस्य आणि कर्मचारी सहभागी झाले.

सरपंच कल्पनाताई म्हस्के, उपसरपंच राजेश घिये आणि ग्रामविकास अधिकारी अलोणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांचे स्वागत करत गावाच्या विकास कामांची माहिती दिली. जिल्हाधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीच्या कामकाजाचे कौतुक करत गावात सुरू असलेल्या योजनांची अधिक प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले.

# शासकीय माध्यमिक आश्रमशाळा मारेगाव येथे प्रवेशोत्सव व पालक मेळावा उत्साहात संपन्न




**सिंदेवाही | प्रतिनिधी**

शासकीय माध्यमिक आश्रमशाळा मारेगाव येथे दिनांक २७ जून २०२५ रोजी प्रवेशोत्सव व पालक मेळाव्याचे आयोजन उत्साहात करण्यात आले. या कार्यक्रमास डी. के. टिंगुसले (सहाय्यक प्रकल्प अधिकारी, प्रशासन), प्रकल्प कार्यालय, चंद्रपूर हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक ए. सी. बिसेन होते. यावेळी रुपेश मडावी (अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती), परशुरामजी सलामे (माजी अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती) तसेच नरेश शिडम यांची उपस्थिती लाभली. नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचे फुलांचा गुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना बैलबंडीत बसवून गावात प्रभातफेरी काढण्यात आली, याला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. इयत्ता दहावीत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाय. कुमरे यांनी तर आभार प्रदर्शन जयाराम पवार यांनी केले. कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिरूर तालुक्यात अल्पवयीन मुलीवर कथित अत्याचार;आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल

## पीडितेच्या गर्भधारणेनंतर उघडकीस आलेला प्रकार

**शिरूर | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील एका गावात एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर कथित लैंगिक अत्याचार झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. संबंधित प्रकार दीर्घ काळ घरातल्या ओळखीच्या व्यक्तीकडून घडल्याची माहिती असून, मुलीच्या अचानक प्रकृती बिघडल्यावर हा प्रकार उघडकीस आला.

पीडित मुलीच्या प्रकृतीत काही दिवसांपासून बिघाड झाल्याने तिला वैद्यकीय तपासणीसाठी बारामती येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तपासणीदरम्यान ती तीन महिन्यांची गर्भवती असल्याचे निष्पन्न झाले. डॉक्टरांच्या अहवालानंतर पालकांनी तिला विश्वासात घेऊन विचारणा केली असता, पीडितेने आपल्यावर झालेल्या अत्याचाराची माहिती दिली.

पीडितेच्या जबाबानुसार, संबंधित आरोपी तिच्याच ओळखीतील असून अनेकदा त्यांच्या घरी येत-जात असे. भावनिक जवळीक साधून त्याने तिचा विश्वास संपादन केला आणि त्यानंतर वेळोवेळी तिच्यावर शारीरिक संबंधांसाठी दबाव टाकण्यात



आला, असा आरोप तिने केला आहे.या प्रकरणी शिरूर पोलीस ठाण्यात पॉक्सो कायद्यासह भारतीय दंड संहितेच्या संबंधित कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी पीडितेचा जबाब नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे. आरोपी पसार झाला असून, त्याचा शोध सुरू असल्याचे पोलिस सूत्रांनी सांगितले.

# राज्यातील बोगस शिक्षक भरती व शालार्थ आयडी घोटाळ्याची एसआयटीमार्फत चौकशी

## विधान परिषदेतील आ.सुधाकर अडबाले यांच्या प्रश्नाला शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांचे उत्तर

**चंद्रपूर | प्रतिनिधी**

राज्यात शिक्षक पदभरती व शालार्थ आयडी घोटाळ्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून यामुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर संशयाची छाया निर्माण झाली आहे. नागपूर विभागातून उगम पावलेल्या या घोटाळ्याची व्याप्ती आता राज्यभर पसरली आहे. याच पार्श्वभूमीवर आमदार सुधाकर अडबाले यांनी शुक्रवार, दि. ४ जुलै रोजी विधान परिषदेच्या तारांकित प्रश्नाद्वारे या प्रकरणाची राज्यस्तरीय विशेष तपास पथक (एसआयटी) ने चौकशी करण्याची मागणी केली.या मागणीला उत्तर देताना शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांनी सदर प्रकरणाची गंभीर दखल घेत गृह, शिक्षण विभागातील निवृत्त अधिकारी व उच्च न्यायालयातील निवृत्त न्यायाधीशांचा समावेश असलेल्या एसआयटीची नियुक्ती केली जाणार असल्याचे स्पष्ट केले.




या घोटाळ्याचे मूळ २०१३ पूर्वी डीएड पूर्ण केलेल्या उमेदवारांच्या मृत शिक्षण अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांद्वारे झालेल्या नियुक्त्या आणि २०१९ नंतर बनावट शालार्थ आयडी मिळवून शासनाच्या निधीची लूट यामध्ये आहे. अंदाजे १००० कोटींपेक्षा अधिक रकमेचा भ्रष्टाचार या प्रकरणात झाल्याची शक्यता असून यामध्ये शिक्षण उपसंचालक, संचालक, आयुक्त कार्यालय आणि मंत्रालयातील अधिकारी सामील असल्याचे समोर आले आहे.

या प्रकरणात आतापर्यंत १८ पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांना अटक करण्यात आली आहे, तर मुख्य सूत्रधार गेल्या तीन महिन्यांपासून फरार आहे. त्याला अद्याप अटक करण्यात न आल्याबाबतही आमदार अडबाले यांनी प्रश्न उपस्थित केला. तसेच दोषींना बडतर्फ करणे आणि त्यांच्या संपत्तीची अंमलबजावणी संचालनालयाकडून (ईडी) चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली.नागपूर, भंडारा, नाशिक, जळगाव या जिल्ह्यांमध्येही बोगस शिक्षक भरती व शालार्थ आयडी घोटाळे उघडकीस आले असून, हे केवळ विभागीय नव्हे तर राज्यस्तरीय स्वरूपाचे आर्थिक आणि प्रशासकीय अपयश असल्याचे विधान परिषदेतील चर्चेत अधोरेखित झाले.राज्यमंत्री पंकज भोयर यांनी उत्तरात स्पष्ट केले की, या प्रकरणांची चौकशी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत सुरू असून, लवकरच एसआयटीमार्फत संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल.

# एक पेड मॉ के नाम उपक्रमांतर्गत वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला

**मूल (प्रतिनिधी)**–सामाजिक वनीकरण विभाग, चंद्रपूर परिक्षेत्र, मूल यांच्या वतीने एक पेड मॉ के नाम या उपक्रमांतर्गत आणि वन महोत्सव वृक्षलागवड मोहीम योजनेअंतर्गत ४ जुलै रोजी जुना सोमनाथ परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमात सामाजिक वनीकरण, मूल येथील वनपरिक्षेत्र अधिकारी एस. जे. बगडे, वनपाल विशाल येरमे, वनरक्षक विश्वास चौधरी, वनपाल सिंदेवाहीचे कार्तिक येनूरक, वनरक्षक सिंदेवाहीचे शिरसागर मूलमूले यांनी सहभाग घेतला.

संजीवन पर्यावरण संस्था, मूल या संस्थेच्या वतीने उमेशसिंह झिरे, पंकज उजवने, प्रशांत केदार, प्रभाकर धोटे, हर्षल वाकडे, हौशीक मंगर आणि तरुण उपाध्ये उपस्थित होते.

वृक्षलागवडीसाठी योग्य ठिकाणी निवड करून, विविध प्रकारच्या झाडांची लागवड करण्यात आली. उपस्थित पर्यावरणप्रेमींनी परिसर स्वच्छ ठेवण्याचे आणि लावलेली झाडे जगवण्याचे संकल्प या वेळी घेतले. कार्यक्रमाचे आयोजन करताना पर्यावरण संवर्धनाची जाणीव जनमानसात रुजवण्यावर भर देण्यात आला.

या उपक्रमामुळे परिसरात हिरवळ वाढण्यास मदत होणार असून, भविष्यातील पिढ्यांसाठी पर्यावरण पूरक वातावरण निर्माण होईल, असा विश्वास सहभागींनी व्यक्त केला.



# शालेय विद्यार्थ्यांना 'स्टिंग'सारख्या उत्तेजक पेयांपासून दूर ठेवण्याची ग्राहक पंचायतीची मागणी



**सोलापूर । प्रतिनिधी**

शालेय वयातील विद्यार्थ्यांमध्ये 'स्टिंग' आणि तत्सम प्रकारच्या उत्तेजक पेयांचे वाढते सेवन ही एक गंभीर बाब बनत चालली आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक आरोग्यावर दुष्परिणाम होत असून, अशा पेयांपासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्यासाठी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, करमाळा शाखेने गटशिक्षणाधिकारी व वरिष्ठ अधिकाऱ्यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.करमाळा येथील गटशिक्षणाधिकारी कार्यालयात टकले यांच्याकडे हे निवेदन सादर करण्यात आले. यावेळी जिल्हा महिला आघाडी प्रमुख माधुरी परदेशी, तालुका अध्यक्ष ब्रह्मदेव नलावडे, तालुका संघटक अजिम खान, कार्यकारिणी सदस्य संजय हंडे, भीमराव कांबळे, मंजिरी जोशी, अनिल माने आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे की, स्टिंग सारख्या पेयांमध्ये असलेले कॅफिन व इतर उत्तेजक घटक लहान वयातील विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक थकवा, निद्रानाश, मानसिक अस्थैर्य आणि व्यसनाधीनता निर्माण करू शकतात. विद्यार्थ्यांमध्ये या पेयांचे व्यसन वाढत असून, शाळेच्या परिसरातच त्याचा खप होत असल्याचे निदर्शनास येत आहे. ग्रामीन व शहरी शाळांमध्ये अशा पेयांच्या उपलब्धतेवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रत्येक मुख्याध्यापकांना सूचित करून विद्यार्थ्यांना या पेयांपासून दूर ठेवण्याचे आदेश द्यावेत, तसेच शाळा पातळीवर प्रबोधन करावे, अशी मागणी ग्राहक पंचायतीने केली आहे. हे निवेदन गटशिक्षणाधिकारी यांच्यासह जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि शालेय शिक्षणमंत्री यांनाही देण्यात आले आहे.

### स्टिंग या पेयावर स्पष्ट सूचना

**स्टिंगसारख्या पेयांच्या बाटल्यांवरच नमूद आहे की, हे पेय मुलांसाठी, गरोदर महिलांसाठी आणि कॅफिनसंबंधित ऍलर्जी असणाऱ्यांसाठी वापरायचे नाही. तसेच कोणत्याही वयोगटातील व्यक्तींनी ते ५०० मि.ली. पेक्षा अधिक प्रमाणात सेवन करू नये, असेही स्पष्टपणे लिहिले आहे.तरीही, विद्यार्थी हे पेय दररोज मोठ्या प्रमाणात घेत असल्याचे निरीक्षणात आले आहे, ही बाब गंभीर असून तातडीने लक्ष देण्याची गरज आहे.**


**"विद्यार्थ्यांचे आरोग्य जपणे ही संपूर्ण समाजाची जबाबदारी आहे. या पेयांपासून विद्यार्थ्यांना दूर ठेवण्यासाठी पालक, शिक्षक आणि प्रशासन यांनी एकत्रित प्रयत्न करणे आवश्यक आहे.**
**भीष्माचार्य चांदणे, ग्राहक पंचायत, करमाळा**

# नादरपूर ग्रामस्थांची मागणी: डावा कालवा व पोटचारीचे संवर्धन तात्काळ करावे

**पिशोर । जावेद शेख**

अंजना-पळशी मध्यम प्रकल्पाच्या अंतर्गत नादरपूर शिवारातून वाहणाऱ्या डावा कालवा व पोटचारीची कामे मोठ्या प्रमाणावर पार पडलेली असून, त्यासाठी शासनाने कोट्यवधींचा निधी खर्च केला आहे. या कालव्यांचे आणि पोटचारीचे नियमित देखभाल व संवर्धन करण्याची जबाबदारी सिंचन विभागावर असतानाही आजतागायत त्याकडे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे. यामुळे शेतकरी वर्गात प्रचंड नाराजीचे वातावरण पसरले आहे.

मौजे नादरपूर येथील ग्रामसभेत या विषयावर वारंवार चर्चा होऊन ठरावही पारित करण्यात आले आहेत. ग्रामसभेच्या ठरावानुसार शेतकऱ्यांची भूसंपादित जमीन सातबारा उताऱ्यातून कमी करणे, तसेच पोटचारीची साफसफाई व दुरुस्ती करणे आवश्यक असूनही, अद्याप याची अंमलबजावणी झालेली नाही.पावसाळा सुरू झाल्याने पोटचारी फुटण्याचा धोका निर्माण झाला



आहे. यामुळे शेतमालाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे. पोटचारीचा ओघ वाढल्यास नादरपूर शिवारातील शेतजमिनी जलमय होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

ग्रामस्थांनी स्पष्ट केले की, कालवा व पोटचारी लगत असलेले रस्तेही अत्यंत खराब स्थितीत असून त्यांचे संवर्धन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. काही ठिकाणी व्यक्तीगत स्वार्थासाठी या पायाभूत सुविधांमध्ये अडथळा आणणाऱ्यांविरोधात तात्काळ कारवाई करावी, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली आहे.

नादरपूर ग्रामपंचायतीने या संदर्भात सुमारे आठ दिवसांपूर्वी सिंचन विभागाला निवेदन सादर केले आहे. विभागाचे इंजिनिअर शिशिर गंजाळे यांच्याशी फोनवरून पोटचारीच्या साफसफाईसह रस्त्यांच्या देखभालीबाबत चर्चा देखील करण्यात आली होती. मात्र, आठवड्यानंतरही कोणतीही ठोस कार्यवाही न झाल्यामुळे सिंचन विभागाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेतकरी आणि ग्रामस्थांनी यासंदर्भात पुन्हा एकदा सिंचन विभागाला विनंती केली असून, पावसाळ्यात संभाव्य नुकसान टाळण्यासाठी पोटचारीची तातडीने साफसफाई करावी, रस्त्यांचे योग्य पद्धतीने संवर्धन करावे आणि अंमलबजावणीला गती द्यावी, अशी जोरदार मागणी केली जात आहे.

## शेलगाव ग्रामपंचायतीमध्ये नवे नेतृत्व

# रेश्मा कुकडे सरपंच, सुलोचना जगताप उपसरपंचपदी बिनविरोध निवड

**सोलापूर । प्रतिनिधी**

माळशिरस तालुक्यातील शेलगाव (क) ग्रामपंचायतीमध्ये नवीन नेतृत्वाची निवड प्रक्रिया शांततेत पार पडली असून, रेश्मा राहुल कुकडे यांची सरपंचपदी तर सुलोचना आप्पा जगताप यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.ग्रामपंचायतीच्या कार्यालयात गुरुवारी पार पडलेल्या निवडणूक कार्यक्रमाला निवडणूक निर्णय अधिकारी मंडळ अधिकारी रविंद्र वळेकर, ग्रामसेवक आबासाहेब खाडे, तलाठी राम खुडे, तसेच मावळते सरपंच यमुना आत्माराम वीर व उपसरपंच लक्ष्मण विश्वनाथ ढावरे यांची उपस्थिती होती. मावळत्या सरपंच व उपसरपंचांनी नियमानुसार आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर निवड प्रक्रियेला सुरुवात झाली.



सरपंचपदासाठी रेश्मा कुकडे यांचा एकमेव अर्ज आणि उपसरपंचपदासाठी सुलोचना जगताप यांचा एकमेव अर्ज प्राप्त झाल्याने दोघांचीही बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य कविता सचिन वीर, धर्मराज शिंदे, अशोक काटुळे, यमुना वीर व लक्ष्मण ढावरे उपस्थित होते.निवडीनंतर नूतन सरपंच व उपसरपंच यांचा ग्रामपंचायत व ग्रामस्थांच्या वतीने सन्मान करण्यात आला. या वेळी आत्माराम वीर, आनंद वीर, महादेव सरडे, नागनाथ सरडे, विकास वीर , अभिमान वीर, कल्याण नवले, मयूर वीर, राजाराम शिंदे, हर्षवर्धन वीर, केशव दास, गणेश माने, सुनील माने, प्रदीप बनसोडे, संदीप पाटील, अनिल माने, भूषण माने आदी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.नवीन पदाधिकाऱ्यांकडून गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक कार्यप्रवृत्तीची अपेक्षा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

# बिटले जि.प.शाळेतील चिमुकल्यांच्या बालदिंडीने भक्तिरसात न्हालं गाव

**मोहोळ । प्रतिनिधी**

आषाढी वारीच्या पवित्र निमित्ताने मोहोळ तालुक्यातील बिटले येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेषात टाळ-मृदंगाच्या गजरात काढलेली बालदिंडी गावात भक्तिमय वातावरण निर्माण करणारी ठरली. 'ज्ञानोबा-तुकोबांचा जयजयकार' करत या चिमुकल्यांनी गावातील प्रमुख रस्त्यांवरून दिंडी काढून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या आवारातून झाली. हातात पताका, मुखात हरिनाम व पावलात टाळांचा ठेका असलेल्या विद्यार्थ्यांची शिस्तबद्ध रांग गावातील चौका-चौकात थांबत वारकरी परंपरेचे दर्शन घडवत होती. प्रत्येक ठिकाणी गावातील भजनी मंडळांसोबत विद्यार्थ्यांनी टाळ-मृदुंगाच्या साथीने अभंग गायन करत सर्वांनाच हरिभक्तीमध्ये सामील करून घेतले.

या भक्तिमय दिंडीमध्ये ग्रामपंचायतीचे सर्व सदस्य, सरपंच व उपसरपंच, शाळेतील शिक्षक, अंगणवाडी सेविका, विविध विभागांचे कर्मचारी तसेच गावकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या वेळी नाना उघडे, प्रवीण माने, जीवन धेंडे, मारुती करंडे, मनोज कुलकर्णी, नरसिंह दातार, धुळा खताळ, बाळू पाटील, बाळकृष्ण आदलिंगे, सौदागर आदलिंगे, भास्कर शिंदे, भारत चव्हाण, ताई हजारे, तारामती आदलिंगे, राजश्री खताळ, शारदा आदलिंगे, अनिल जाधव, बबन ढवण आदी मान्यवर उपस्थित होते.

वैभव हजारे यांनी बालवारकऱ्यांना शिरा आणि गोड भाताचा अल्पोपहार तर बालाजी सलगर यांनी बिस्किटांचे वाटप करून आनंद द्विगुणित केला. शेवटी महिलांनी व मुलींनी फुगडी खेळून दिंडीची मनोहारी सांगता केली.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये भक्तीपरंपरेचे बीजारोपण झाले असून, वारकरी संप्रदायातील मूल्यांची ओळख त्यांना मिळाली. एकात्मता, शिस्त, आणि भक्तिभावाचे शिक्षण देणाऱ्या अशा कार्यक्रमांचे आयोजन ग्रामीण भागात अभिमानास्पद असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# रोहा येथे छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिराचे आयोजन

**रोहा । ज्ञानेश्वर वाणी**

राज्य शासनाच्या निर्देशानुसार आणि रोहा तहसील कार्यालयाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर अभियान दि. ५ जुलै २०२५ रोजी सकाळी १० वाजता रोहा शहरातील ज्येष्ठ नागरिक सभागृहात पार पडणार आहे. याबाबत रोहा तहसीलदार डॉ. किशोर देशमुख यांनी नागरिक, शेतकरी आणि विद्यार्थ्यांनी या शिबिरास मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले आहे.

या शिबिरास महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे, जिल्हाधिकारी किशन जावळे, उपविभागीय अधिकारी रोहा ज्ञानेश्वर खुटवड हे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. शिबिराच्या माध्यमातून विविध विभागांमार्फत मंजुरी पत्र, दाखले, प्रमाणपत्रांचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. त्याचबरोबर उपस्थित नागरिकांचे प्रश्न व समस्या यांना शिबिरात तात्काळ उत्तर व तोडगा मिळवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

शिबिरात तालुक्यातील सर्व विभाग सहभागी होणार असून, शासनाच्या नवीन योजनांची माहिती, तसेच तत्संबंधित अर्ज भरण्यासाठी सोयीची व्यवस्था करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांसाठी आणि नागरिकांसाठी लागणारे विविध शासकीय दाखलेही तत्काळ उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. रोहा तालुक्यातील पंचायत समिती, कृषी विभाग, आरोग्य विभाग, सार्वजनिक बांधकाम, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, भू अभिलेख कार्यालय, संजय गांधी निराधार योजना, पुरवठा विभाग, निवडणूक शाखा आणि आपत्ती व्यवस्थापन विभाग या सर्व विभागांकडून माहितीपर स्टॉल्स उभारण्यात येणार असून, नागरिकांना थेट मार्गदर्शन व सेवा एकाच ठिकाणी मिळणार आहे.या महसूल शिबिरामुळे नागरिकांच्या अनेक प्रश्नांची सोडवणूक होण्यास हातभार लागणार असून, शासन-प्रशासन जनतेच्या दारात सेवा घेऊन जाण्यास कटिबद्ध आहे, याचे प्रत्यक्ष उदाहरण ठरणार आहे.;

# मनोरुग्ण,अनाथांसोबत वाढदिवस साजरी करत मंगेश बोबडे यांनी दिला माणुसकीचा संदेश

**चिमूर । शेषराव राऊत**

ग्रामीण भाषेतील विनोदी सादरीकरणातून राज्यभरात प्रसिद्धी मिळवणारे मंगेश बोबडे यांनी आपला वाढदिवस समाजातील दुर्लक्षित घटकांसोबत साजरा करत एक आगळा वेगळा आदर्श निर्माण केला आहे. चिमूर तालुक्यातील जामगाव कोमटी येथील दिव्यवंदना आधार प्रतिष्ठानच्या मनोरुग्ण पुनर्वसन केंद्रात त्यांनी वाढदिवस साजरा केला. यावेळी रस्त्याच्या कडेला राहणारे बेघर, बेवारस, भिक्षेकरी, अनाथ, निराधार आणि मनोरुग्ण बांधव उपस्थित होते.

प्रत्येक वर्षीप्रमाणे यंदाही मंगेश बोबडे यांनी आपला वाढदिवस उत्सव न करता समाजोपयोगी कार्यातून साजरा केला. या वेळी सर्व उपस्थितांना प्रेमपूर्वक जेवण देण्यात आले. केक कापण्याऐवजी गरजू लोकांच्या ताटात अन्न वाढून, त्यांनी खरी माणुसकी जपली. कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हास्य फुलले. हीच त्यांच्या कार्याची खरी ताकद होती.



जामगावसारख्या छोट्याशा खेड्यातील अत्यंत सामान्य कुटुंबात जन्मलेल्या मंगेश बोबडे यांनी फुंकर भरलेल्या संघर्षातून आपली ओळख निर्माण केली आहे. अवघ्या दोन वर्षांत त्यांनी ग्रामीण भाषेतील हास्यरूप सादरीकरणातून हजारो लोकांची मने जिंकली आहेत. त्यांच्या 'भिशीचा पोट्या मंग्या' या नावाने ते घराघरात पोहोचले आहेत.

त्यांच्या या सादरीकरणाला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून त्यांचे दोन लाख चाळीस हजारावर अनुयायी सामाजिक माध्यमांवर आहेत. त्यांच्या लोकप्रियतेपेक्षा त्यांच्या संवेदनशीलतेचं व त्यांच्या सामाजिक जाणिवेचं अधिक कौतुक होत आहे.

या उपक्रमात मंगेश बोबडे यांचे मित्र, गावकरी आणि दिव्यवंदना प्रतिष्ठानचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. मंगेश बोबडे म्हणाले, समाजात मागे राहिलेल्या बांधवांसोबत वाढदिवस साजरा करणे ही माझ्यासाठी आनंदाची बाब आहे. प्रतिष्ठानसारख्या संस्थांनी घेतलेला उपक्रम अनुभवण्यासाठी प्रत्येकाने एकदा तरी येथे अवश्य भेट द्यावी.

माणूस म्हणून जगायचं असेल, तर माणसांमध्ये माणुसकी जपणं गरजेचं आहे, हा संदेश मंगेश बोबडे यांनी आपल्या कृतीतून दिला आहे. या उपक्रमामुळे रील मधला कलाकार रिअल जीवनातही हिरा असल्याचं सिद्ध झालं आहे.

# एन.एस.दाते कन्स्ट्रक्शनच्यावतीने प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांचे स्वागत व सन्मान

**पारनेर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत निवड होऊन यशदा, पुणे येथे प्रशिक्षण पूर्ण केलेले अधिकारी कार्यानुभवासाठी ग्रामीण भागात दाखल झाले असताना, वासुंदे (ता. पारनेर) येथे एन. एस. दाते कन्स्ट्रक्शनच्यावतीने त्यांचे उत्साहपूर्ण स्वागत व सन्मान करण्यात आला. इंजिनिअर निकिल सुनील दाते (गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर) यांच्या हस्ते हे स्वागत करण्यात आले.

या वेळी पुजा राठोड (उपविभागीय पोलीस अधिकारी), नम्रता म्हस्के (सहाय्यक आयुक्त - वस्तू व सेवा कर), श्रद्धा झिंजुरके (शिक्षणाधिकारी), विकास वल्ले (सहकार विभाग), प्रशांत जमदाडे (सहकार आयुक्त - जीएसटी), ऋषिकेश सावंत (गटविकास अधिकारी) हे अधिकारी उपस्थित होते. हे अधिकारी ग्रामीण भागातील प्रशासनाची, विकासकामांची व स्थानिक समस्यांची माहिती घेण्यासाठी वासुंदे येथे आले होते.

प्रशिक्षणाचा भाग म्हणून या अधिकाऱ्यांनी गावातील विकासकामांची पाहणी, ग्रामस्थांशी थेट संवाद साधला आणि विविध शासकीय



योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांविषयी अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

या उपक्रमात अधिकारी वर्गाने गावातील आरोग्य सुविधा, शिक्षण व्यवस्था, पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता व्यवस्था, महिला बचत गटांची कामगिरी याविषयी माहिती घेतली. गावातील सामाजिक उपक्रमांचे कौतुक करत ग्रामीण भागात होत असलेली प्रगती आणि ग्रामस्थांची सहभागिताच खऱ्या विकासाचे मर्म आहे,असे मत अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांची भेट आणि संवादामुळे गावात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, हा अनुभव ग्रामीण विकासाच्या दिशेने एक आश्वासक पाऊल ठरतो, असे ग्रामस्थांचेही मत होते.

इंजिनिअर निकिल दाते यांनी अधिकाऱ्यांचे स्वागत करत सांगितले की, गावोगाव विकासकामांमध्ये तरुण अधिकाऱ्यांचा सहभाग आणि अनुभव फार मोलाचा ठरतो. युवकांनी या अधिकाऱ्यांकडून प्रेरणा घेऊन आपले उद्दिष्ट निश्चित करावे आणि लोकसेवेत पदार्पण करावे.

# कांदेगाव डाक कार्यालयात आय.पी.पी.बी सेवा तीन महिन्यांपासून ठप्प–सहा गावांचे नागरिक हैराण

## डाक कार्यालय सुरू असतानाही व्यवहारासाठी १० किमी अंतराची पायपीट; सेवा त्वरित सुरू करण्याची नागरिकांची मागणी

**देवळी । प्रतिनिधी**

कांदेगाव येथील डाक कार्यालयात 'इंडिया पोस्ट पेमेंट बँक' (आय.पी.पी.बी.) ची सेवा गेल्या तीन महिन्यांपासून बंद आहे. परिणामी या कार्यालयाअंतर्गत येणाऱ्या सहा गावांतील कांदेगाव, नांदगाव, सावंगी, तळणी (भागवत), हिरापूर व सेदरी शेकडो खातेदारांना आपल्या बँक व्यवहारांसाठी पाच ते दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या इंझाळा, विजयगोपाल व सोनोरा (ढोक) येथील इतर डाक कार्यालयांमध्ये जावे लागत आहे.या अडचणीमुळे नागरिकांचे केवळ आर्थिक नुकसानच नाही तर वेळेचाही अपव्यय होत आहे. विशेषतः रक्षाबंधनाच्या पार्श्वभूमीवर बहिणींनी पाठवलेले पैसे काढण्यासाठीही नागरिकांना इतर ठिकाणी जावे लागत असून डाक कार्यालय असूनही तो पांढरा हत्ती ठरत असल्याची भावना स्थानिकांमध्ये आहे.ग्रामस्थांनी दिलेल्या माहितीनुसार, कांदेगाव डाक कार्यालयात नव्या पोस्टमास्तरची नियुक्ती होऊन तीन महिने उलटले तरीही आय.पी.पी.बी. सेवा सुरू करण्यात आलेली नाही. याकडे जिल्हास्तरावरील डाक अधिकारी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. तोंडी तक्रारी करूनही वरिष्ठ पातळीवर कुठलीही ठोस कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये नाराजी पसरली आहे. या प्रकरणी प्रतिक्रिया देताना गट ग्रामपंचायत कांदेगावचे सरपंच प्रदीप हेंडवे म्हणाले, तीन–तीन महिन्यांपासून डाक कार्यालयातील इंडिया पोस्ट पेमेंट बँकेची सेवा बंद ठेवणे म्हणजे डाक विभागातील अधिकाऱ्यांचा हेकेखोरपणा आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी आणि सेवा त्वरित सुरू करण्यात यावी.दरम्यान, ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा दिला आहे की, जर ही सेवा तातडीने सुरू करण्यात आली नाही, तर स्थानिक नागरिक डाक कार्यालयाला कुलूप ठोकण्यास भाग पाडले जातील.



### हायस्कूल ते बाजार चौकापर्यंत सिमेंट रस्ता तयार करण्याची मागणी

## छत्रपती शिवाजी महाराज मार्केटमधील व्यापाऱ्यांनी मुख्य अधिकाऱ्यांकडे निवेदन देत रस्त्याच्या दुरवस्थेकडे वेधले लक्ष

**देवळी । प्रतिनिधी**

देवळी शहरातील नगरपरिषद हायस्कूल ते आठवडी बाजार चौक दरम्यानचा मुख्य रस्ता खड्ड्यांनी भरलेला असून, या रस्त्याची तातडीने सिमेंट रस्त्यात रूपांतर करावे, अशी मागणी छत्रपती शिवाजी महाराज मार्केटमधील व्यापाऱ्यांनी निवेदनाद्वारे नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांकडे केली आहे.

उल्लेखनीय म्हणजे, या रस्त्यालगतच पोस्ट ऑफिस, छत्रपती शिवाजी महाराज कॉम्प्लेक्स आणि आठवडी बाजार असल्यामुळे या भागातून दररोज हजारो नागरिकांची ये–जा होते. शालेय विद्यार्थी, बाजारात खरेदीसाठी येणारे ग्राहक आणि स्थानिक व्यापाऱ्यांना या खड्ड्यांमुळे अपार त्रास सहन करावा लागत आहे. पावसाळ्यामुळे खड्ड्यांमध्ये पाणी साचते आणि वाहनांच्या चाकांतून उडणारे पाणी पादचाऱ्यांवर उडते, परिणामी नागरिक त्रस्त झाले आहेत.

या परिसरातील व्यापाऱ्यांनी एकत्र येत मुख्याधिकारी नगरपरिषद देवळी यांना निवेदन सादर केले. या निवेदनात रस्त्याची अत्यवस्थ स्थिती निदर्शनास आणून देत, सदर रस्ता सिमेंटचा करून नागरिकांना त्रासमुक्त करावे, अशी स्पष्ट मागणी करण्यात आली आहे.निवेदन देताना व्यापारी रवी कात्रे, गजानन पालथे, विनोद रुद्रकार, दिनेश रानगडे, नाना मिरकुटे, विनय साटूनकर, लोखंडे आदी उपस्थित होते. यावेळी मुख्याधिकाऱ्यांना रस्त्याच्या खड्ड्यांमुळे होणाऱ्या समस्यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आणि तातडीने योग्य निर्णय घेण्याची विनंती करण्यात आली.नागरिक आणि व्यापाऱ्यांची रोजची हालअपेष्टा लक्षात घेता, नगरपरिषद प्रशासनाने तत्काळ पावले उचलून सदर रस्ता सिमेंटचा करावा, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे.



## उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संभाव्य एकत्रीकरणाचे पुलगावात स्वागत

**पुलगाव । प्रतिनिधी**

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे खरे वारसदार एकाच व्यासपीठावर येणार असल्याच्या चर्चांना सध्या महाराष्ट्राच्या राजकारणात चांगलाच जोर आला आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या संभाव्य एकत्रीकरणाने मराठी जनतेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, राज्यभरात त्यांच्या स्वागतासाठी स्वयंस्फूर्तीनं बॅनर लावले जात आहेत.पुलगाव शहरातही अशीच उत्स्फूर्त प्रतिक्रिया पाहायला मिळत असून, शहरात विविध ठिकाणी ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याचे स्वागत करणारे फलक झळकत आहेत. मराठी जनतेच्या हक्कासाठी, एक मराठी व्यासपीठ निर्माण व्हावे,अशी भावना स्थानिक नागरिक आणि शिवसेनेचे माजी कार्यकर्ते व्यक्त करत आहेत.या संभाव्य एकत्रीकरणामुळे राज्याचे राजकारण ढवळून निघेल, आणि एक सक्षम विरोधी पक्ष उभा राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. विशेषतः मराठी तरुणाईचा झुकाव या दोन्ही नेत्यांच्या नेतृत्वाकडे असून, आगामी निवडणुकांमध्ये या एकजुटीचा प्रभाव निश्चितच जाणवेल, असे मत राजकीय वर्तुळात व्यक्त होत आहे.

राज ठाकरे यांची भाषणशैली आणि जनसंपर्कातील पकड, तसेच उद्धव ठाकरे यांचे संघटन कौशल्य आणि प्रशासनिक अनुभव यांचा संगम झाल्यास महाराष्ट्रात एक नवे राजकीय पर्व सुरू होण्याची शक्यता आहे.

शिवसेनेचे माजी कार्यकर्ते, तसेच मनसेशी जोडलेले कार्यकर्ते दोघांच्या एकत्र येण्याच्या शक्यतेने प्रेरित झाले असून, हे एकत्रीकरण झाले तर बाळासाहेबांचे स्वप्न पूर्ण होईल,अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

## हिंगणघाटमध्ये वृक्षारोपण करून साजरा केला जिल्हाध्यक्ष विनोद सातपुते यांचा वाढदिवस

### पर्यावरण संवर्धन व विकास समितीच्या उपक्रमात महिलांची मोठी सहभागिता; वृक्षदान व जनजागृतीद्वारे दिला हरित संदेश

**वर्धा । प्रतिनिधी**

पर्यावरण संवर्धन व विकास समितीचे जिल्हाध्यक्ष विनोद सातपुते यांचा वाढदिवस हिंगणघाट येथे अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला. समाजोपयोगी उपक्रम म्हणून वृक्षदान आणि वृक्षारोपण करण्यात आले. ज्ञानेश्वर वार्डातील हनुमान मंदिर परिसरात हा उपक्रम संपन्न झाला.पर्यावरणाचे रक्षण ही काळाची गरज आहे. हवा, पाणी, माती, वनस्पती, प्राणी आणि सूक्ष्मजीव हे पर्यावरणाचे मूलभूत घटक असून मानव जीवन त्यावरच अवलंबून आहे. झाडे लावल्याने निसर्गातील समतोल राखला जातो, प्रदूषण नियंत्रणात राहते आणि भावी पिढ्यांसाठी शुद्ध हवा, पाणी मिळविण्याचा मार्ग खुला होतो. याच उद्देशाने विनोद सातपुते यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपणाचा उपक्रम राबवण्यात आला.



कार्यक्रमात उपस्थितांनी प्लास्टिकचा वापर टाळा, पाण्याचा अपव्यय रोखा, कचरा व्यवस्थापनाचे नियम पाळा या मुद्द्यांवर जनजागृती केली. पर्यावरण रक्षणासाठी सर्वांनी पुढे येण्याची गरज अधोरेखित करण्यात आली.याप्रसंगी समितीच्या जिल्हा उपाध्यक्षा नमिता पाठक, तालुकाध्यक्षा श्रेया चापले, शहराध्यक्ष राजू सावरकर, सदस्य वैशाली काटकर, प्रियका घोडे, रूपाली देशमुख, अर्चना घोडखंडे, अर्चना उरखाडे, मयूरी तपासे, पूजा राठौर, माया चंदनखेडे, प्रियंका ऊरकुरेडे, पल्लवी घोडे, हिमांगी लाबट, नीलिमा घोड्खादे, संगीता कुडमथे यांच्यासह अनेक महिला पर्यावरणप्रेमी आणि बालवृक्षमित्र ओजस सातपुते उपस्थित होते.कार्यक्रमातून हरित वाढदिवस ही संकल्पना समाजात रुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला असून भविष्यातही अशा उपक्रमांची मालिका राबविण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

### चला हो पंढरी जाऊ... जीवाचा जीव लग पाहू!

## सत्य साई समितीच्या वतीने आषाढी वारीनिमित्त दिंडीचे आयोजन



**सेलू । प्रतिनिधी**

चला हो पंढरी जाऊ, जीवाचा जीव लग पाहू...या भक्तिभावपूर्ण गजरात, आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त सेलू येथील सत्य साई समितीच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. यामध्ये पायदळ दिंडी व पालखी यात्रा विशेष आकर्षण ठरली.

दि. १ जुलै २०२५ रोजी मंगळवार पासून सेवाग्राम धर्मावरम येथून सुरू झालेली ही दिंडी तब्बल ५२ किलोमीटरचे पायदळ अंतर पार करून गुरुवार ते शनिवार दरम्यान साई नामाच्या गजरात भक्तिभावाने पार पडली.या पालखी सोहळ्याचे संचालन साई भक्त सुरेश बोडखे, गोहणे, तडस, कोल्हे, केळे, एक्सटकर, करस्तकर, खळगी यांच्यासह अनेक महिला–पुरुष भक्तांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. संपूर्ण दिंडीमध्ये विठ्ठल नामाचा गजर, भजन–कीर्तन, साई पूजन व विविध आध्यात्मिक उपक्रमांनी वातावरण भक्तिमय झाले.परतीचा कार्यक्रम ८ जुलै २०२५ रोजी नियोजित असून या दिवशीही भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन समितीने केले आहे.सत्य साई समितीच्या या उपक्रमातून भक्ती, शिस्त, आणि सेवा यांचा संगम दिसून आला असून या वारीतून ग्रामीण भागातील नवतरुणांमध्येही अध्यात्मिक प्रेरणा निर्माण झाल्याचे दिसून येत आहे.

## पुलगाव शहरातील जनसमस्यांवर न.प.मुख्याधिकाऱ्यांसोबत बैठक

### संजय गाते यांच्या उपस्थितीत तातडीने कार्यवाहीसाठी निवेदन



**पुलगाव । प्रतिनिधी**

पुलगाव शहरातील विविध प्रलंबित जनसुविधा आणि नागरी समस्यांबाबत नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांसमवेत आज महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत भाजपाचे जिल्हाध्यक्ष संजयजी गाते यांच्या प्रमुख उपस्थितीत नगर परिषद पुलगावच्या मुख्याधिकाऱ्यांशी चर्चा करण्यात आली.बैठकीत शहरातील मूलभूत सुविधांची दुरवस्था, अपूर्ण विकासकामे, जलनिस्सारण, स्वच्छता, रस्ते, पथदिवे आदी समस्यांवर चर्चा करण्यात आली. यावेळी संजय गाते यांनी मुख्याधिकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत निर्देश दिले की, प्रलंबित असलेल्या सर्व नागरी सुविधा त्वरित पूर्ण करण्यात याव्यात आणि प्रशासनाने सक्रिय भूमिका घेतली पाहिजे. यासंदर्भात एक निवेदनही मुख्याधिकाऱ्यांना देण्यात आले.

या प्रसंगी भाजपाचे शहराध्यक्ष प्रशांत इंगोले, भाजप ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष तथा माजी नगरसेवक मंगेश झाडे, माजी सत्ताधारी पक्ष गटनेते राजीव जयस्वाल, माजी नगरसेवक जय भारत कांबळे, माजी नगरसेवक गौरव दांडेकर, भाजपाचे ज्येष्ठ नेते सुरेश सुखीजा, शरद सावरकर, राहुल काळे आणि रिचर्ड क्रॉस आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.मुख्याधिकारी यांनी या सर्व तक्रारींची गंभीर दखल घेतली आणि तत्काळ विभागप्रमुखांना बोलावून संबंधित विषय मार्गी लावण्याचे आदेश दिले. लवकरात लवकर समस्या सोडवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### प्रशिक्षणार्थी राजपत्रित गट–ब अधिकाऱ्यांची तळोदी गावाला अभ्यासभेटर

## पोलीस पाटील विजय कोल्हे यांनी ग्रामविकासाचा सविस्तर आढावा दिला

**सेलू । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत यश मिळवलेल्या आणि सध्या नागपूर येथील प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेत असलेल्या गट–ब संवर्गातील नवोदित अधिकाऱ्यांनी तळोदी (तालुका सेलू) या गावाला दिनांक ३ जुलै २०२५ रोजी अभ्यासभेट दिली.

यामध्ये उत्पादन शुल्क अधिकारी, गटविकास अधिकारी, उपशिक्षणाधिकारी, सहाय्यक निबंधक, महिला व बाल कल्याण अधिकारी या पदांवर कार्यरत होणाऱ्या अधिकाऱ्यांचा समावेश होता.

यावेळी गावातील पोलीस पाटील विजय कोल्हे यांनी ग्रामपंचायत सभागृहात उपस्थित अधिकाऱ्यांना गावाचा इतिहास, ग्राम प्रशासन, शेती व्यवस्था, लोकजीवन, नागरिकांची आर्थिक व शैक्षणिक परिस्थिती, कायदा–सुव्यवस्थेची स्थिती, शासकीय योजनांची अंमलबजावणी आणि गावातील प्रमुख समस्या याविषयी सविस्तर माहिती दिली.

भेटीदरम्यान माजी उपसरपंच बबिता नेहारे ही उपस्थित होत्या. अंगणवाडी सेविका कविता बावणे यांनी अंगणवाडीत राबविण्यात येणारे उपक्रम, बालकांच्या पोषण व विकासविषयक माहिती मांडली. तर प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक क्षीरसागर यांनी शालेय उपक्रम, विद्यार्थ्यांची प्रगती आणि शैक्षणिक सुविधा यावर माहिती दिली.

ग्रामपंचायत सचिव नागदेवते , शिपाई राहुल जिंदे आणि मदतनीस मनीषा वकरकर यांचीही यावेळी उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या शेवटी पोलीस पाटील विजय कोल्हे यांनी नवोदित अधिकाऱ्यांना उद्देशून भावनिक अपील करत म्हटले, आपण जेव्हा कार्यभार स्वीकाराल, तेव्हा सामान्य जनतेच्या अडचणी समजून घेऊन संवेदनशील प्रशासन देण्याचा प्रयत्न करा. गावपातळीवर तुम्हाला जनतेचा खरा संपर्क अनुभवायला मिळेल. सर्वांनी समाजहितासाठी न्याय्य निर्णय घेण्याचा प्रयत्न करावा.त्यांनी उपस्थित सर्व प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छाही दिल्या.

## सीएडीचे मंगेश डफरे राष्ट्रीय आर्म रेसलिंग स्पर्धेत रौप्यपदक विजेते

### थ्रिसूरमध्ये झालेल्या स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी



**पुलगाव । प्रतिनिधी**

केरळ राज्यातील थ्रिसूर जिल्ह्यात २८ जून ते १ जुलै २०२५ दरम्यान झालेल्या राष्ट्रीय आर्म रेसलिंग अजिंक्यपद स्पर्धेत सीएडीचे (कॉलज ऑफ आर्मी डिपो) मंगेश डफरे यांनी मास्टर्स गटातील ८० किलो वजनी गटात रौप्य पदक पटकावून उल्लेखनीय कामगिरी केली.

स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मंगेश डफरे यांनी केरळच्या आघाडीच्या खेळाडूवर मात करत अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. अंतिम फेरीत मिझोरामच्या खेळाडूशी अटीतटीच्या लढतीत त्यांना पराभव पत्करावा लागला. मात्र, त्यांनी देशपातळीवर रौप्यपदक मिळवत सीएडीसह संपूर्ण आर्मी कोरचे नाव उज्ज्वल केले.या यशाबद्दल सीएडीचे समादेशक आणि सर्व अधिकारीवर्ग तसेच कर्मचारी यांनी मंगेश डफरे यांचे विशेष अभिनंदन केले आहे. डफरे यांनी दिल्लीत समादेशक महोदयांच्या मार्गदर्शनाखाली दोन महिन्यांचे उच्चस्तरीय प्रशिक्षण घेतले होते. त्याच प्रशिक्षणाच्या जोरावर त्यांनी ही घवघवीत कामगिरी केली.मंगेश डफरे यांनी आपल्या वक्तव्यात सांगितले, खेळ ही केवळ स्पर्धा नसून, तो मानसिक व शारीरिक तंदुरुस्तीचे प्रभावी माध्यम आहे. सातत्यपूर्ण सराव, प्रशिक्षकांचे मार्गदर्शन आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर हे यश शक्य झाले.त्यांच्या या यशाने सीएडीचे कर्मचारी, सहकारी आणि अधिकारी वर्ग आनंदित झाले असून, त्यांचा हा विजय नेहमीच प्रेरणादायी ठरेल, असे सर्वांनी म्हटले आहे.सीएडीचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्याचे स्वप्न घेऊन मंगेश डफरे यांची वाटचाल सुरू असून, त्यांच्याकडून भविष्यात आणखी मोठ्या कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# मुली, तू नावा प्रमाणे प्रतिभावंत हो!

## वृद्धाश्रमातील मातांचे खासदार प्रतिभाताईंना भावनिक आशीर्वाद

## जिल्हाभरात समाजोपयोगी उपक्रमांतून बाळूभाऊंना विविध स्तरांतून आदरांजली





**चंद्रपूर (आशिष घुमे)–मुली, तू नावा प्रमाणेच प्रतिभावंत हो, आणि तुझ्या नवऱ्या सारखीच लोकसेवेची प्रेरणा घेऊन पुढे जात राहा... असे उद्गार वृद्ध मातांनी खासदार प्रतिभाताई धानोरकर यांना म्हटले, आणि उपस्थितांमध्ये भावनांचा पूर उसळला. दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाभरात राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांमध्ये बल्लारपूर येथील मातोश्री वृद्धाश्रमातील हा क्षण विशेष लक्षवेधी ठरला. बाळूभाऊ धानोरकर यांच्या जयंतीनिमित्त खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत चंद्रपूर जिल्ह्यात विविध समाजोपयोगी उपक्रम राबविण्यात आले. या निमित्ताने जनसंपर्क कार्यालय, महाकाली मंदिर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वृद्धाश्रम, उपजिल्हा रुग्णालय, अंध विद्यालय व सार्वजनिक चौकांमध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन झाले. वरोरा येथील जनसंपर्क कार्यालयात सकाळी श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. त्यानंतर शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक व शहीद डाहुले चौक येथे अन्नदान, छत्री वाटप, आणि उपजिल्हा रुग्णालयात नियमित रुग्ण नातेवाईकांसाठी भोजन व्यवस्थेचं उद्घाटन करण्यात आले. या उपक्रमांनी बाळूभाऊंच्या समाजाभिमुख विचारांची आठवण सर्वांना करून दिली.**



चंद्रपूर येथील जनसंपर्क कार्यालयात दिवंगत खासदार बाळूभाऊंना त्यांच्या कार्याची आठवण करत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यानंतर महाकाली मंदिरात अन्नदान उपक्रम पार पडला. कर्मवीर मा. स. कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात नवजात बालकांसाठी मच्छरदाणी वाटप करण्यात आले.बल्लारपूर येथील मातोश्री वृद्धाश्रमात विशेष अन्नदान उपक्रम राबविण्यात आला. यावेळी खासदार प्रतिभाताईंनी प्रत्येक वृद्धाशी संवाद साधला. बाळूभाऊ गेले, पण त्यांच्या रूपात तू उभी आहेस. तू तशीच मायाळू राहा, असे म्हणत वृद्धांनी अश्रूंच्या धारा लपवत तिला आशीर्वाद दिले. काहींनी त्यांच्या हातात हात घेत प्रेमाने डोक्यावरून हात फिरवत तू बाळूभाऊंची खरी वारसदार आहेस,असेही म्हटले.भद्रावती येथे प्रेरणा अंध विद्यालयाला मारुती व्हॅन उपलब्ध करून देण्यात आली. यासह सरकारी रुग्णालयात फळ आणि छत्री वाटप, बंगाली कॅम्प येथील वृद्धाश्रमात धान्य वाटप करण्यात आले. या सर्व उपक्रमांतून गरजू आणि दुर्बल घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचवण्यात आला.

या उपक्रमांदरम्यान उपस्थित राजकीय नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी बाळूभाऊ धानोरकर यांच्या जीवनकार्याचा गौरव केला. लोकसभा क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, शेतकरी, कामगार, गरीब आणि मध्यमवर्गीयांच्या समस्यांसाठी केलेली धडपड, आणि त्यांच्या विनम्रतेची आठवण अनेकांनी बोलून दाखवली.

बाळूभाऊ हे फक्त राजकीय व्यक्तिमत्त्व नव्हते, ते जनतेचे खरे सेवक होते. त्यांच्या कार्याचा आदर्श प्रतिभाताईंनी पुढे नेला पाहिजे, आणि आम्ही त्यांच्या पाठीशी आहोत,असे प्रतिपादन काही ज्येष्ठ कार्यकर्त्यांनी या प्रसंगी केले.दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांच्या जयंतीनिमित्त राबविण्यात आलेले हे सर्व उपक्रम त्यांच्या जनसामान्यांवरील निष्ठेचं आणि लोकसेवेच्या बांधिलकीचं प्रतीक ठरले. या उपक्रमांतून त्यांनी दिलेल्या मूल्यांची आठवण सर्वांना झाली. वृद्धांनी दिलेल्या मुली, तू प्रतिभावंत हो या आशीर्वादांनी उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू आणले आणि वातावरण पूर्णतः भावनांनी ओथंबून गेलं.




## पंतप्रधान ग्रामसडक योजनेतील रस्त्याचे काम निकृष्ट; ग्रामस्थांकडून चौकशीची मागणी

**उमरखेड | प्रतिनिधी**

उमरखेड तालुक्यातील मौजे बिटरगाव ते चिंचोली (संगम) या मार्गावर पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत सुरू असलेले रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला असून, या कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे तहसीलदार यांच्या माध्यमातून करण्यात आली आहे.




राज्य मार्ग क्रमांक २८२ अंतर्गत बिटरगाव ते चिंचोली (संगम) या दरम्यान ८ किलोमीटर ६७० मीटर लांबीचा व ३ मीटर ७५ सेंटीमीटर रुंदीचा रस्ता तयार करण्यात येत आहे. हे काम पुणे येथील टी अँड टी इन्फ्रा लिमिटेड या खासगी कंपनीमार्फत सुरू आहे. सन २०२४ मध्ये या कामासाठी आदेश मंजूर करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्षात कामाची गती अत्यंत संथ असून, दर्जाही अत्यल्प आहे. विशेष म्हणजे संबंधित विभागातील अधिकारी व कर्मचारी हे काम पुरेसे लक्ष न देता दुर्लक्षित करीत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, रस्त्याच्या गिट्टी थरात (जी.एस.बी.) अनेक ठिकाणी चढ–उतार आढळून येतात, तसेच रस्त्याची रुंदी ठिकठिकाणी बदललेली आहे. याशिवाय, आधीच अस्तित्वात असलेल्या डांबरी रस्त्याचा थर न उखडता त्यावरच सरळ दुसरा थर टाकण्यात आल्यामुळे दोन थरांमध्ये योग्य जुळव (बाँडिंग) झालेला नाही. परिणामी, थोड्याच कालावधीत नव्याने टाकलेला रस्ता खराब होण्याची शक्यता असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

याशिवाय, सुमारे दोन किलोमीटर चारशे मीटर अंतराच्या थरासाठी आवश्यक ती आर्द्रता राखली गेली नसल्याने (क्युरिंग प्रक्रिया न झाल्याने) तो थर पूर्णपणे निष्फळ ठरला आहे. रस्त्याच्या बाजूंसाठी भराव तयार करताना मुरुमाऐवजी नाल्यातील काळ्या मातीचा वापर केला जात आहे, ज्यामुळे रस्त्याच्या टिकाऊपणावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. इतकेच नव्हे, तर एक किलोमीटर लांबीच्या सिमेंट काँक्रीट रस्त्यात सुमारे पन्नास टक्के भागात लोखंडी सळ्या (गज) वापरण्यात आलेल्या नाहीत. वाहतुकीसाठी पर्यायी मार्गाची देखील कोणतीही व्यवस्था करण्यात आलेली नसल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

या सर्व घडामोडींमुळे बिटरगाव, चिंचोली व मार्लेगाव येथील ग्रामस्थांत तीव्र नाराजी निर्माण झाली असून, संबंधित बांधकाम कंपनी व अधिकारी यांच्यावर तात्काळ कारवाई करून दोषींना या प्रकल्पावरून हटवण्यात यावे, अशी ठाम मागणी करण्यात आली आहे. या वेळी मोठ्या संख्येने ग्रामस्थ तहसील कार्यालयात उपस्थित होते.

## बदलापूर रेल्वे स्थानकाचे काम संथ गतीने; प्रवाशांचे मात्र हाल

**बदलापूर (प्रतिनिधी)**–मुंबई उपनगरी रेल्वेने प्रवास करणाऱ्यांसाठी रेल्वे ही जरी स्वस्त प्रवासाची साधनं असली, तरी सुविधांच्या कमतरतेमुळे प्रवाशांचे हाल सुरूच आहेत. रोज मरे त्याला कोण रडे अशी स्थिती सध्या बदलापूर स्थानकात पाहायला मिळत आहे. गेली दोन वर्षांपासून येथे सुरू असलेल्या विकासकामांचा फटका सध्या पावसाळ्यात प्रवाशांना मोठ्या प्रमाणावर बसत आहे.स्थानकातील फलाट क्रमांक दोन आणि तीनवर अनेक ठिकाणी छत नसल्यामुळे पावसात प्रवाशांना भिजत उभे राहावे लागत आहे. पादचारी पुलाच्या कामासाठी पत्र्याच्या शेड हटविण्यात आल्या आहेत. परिणामी प्रवाशांना पावसात छत्र्या सांभाळत लोकल गाठण्याची कसरत करावी लागत आहे. काही वेळा छत्री बंद करत चढाव लागतो, तर कधी लोकलमध्ये जागा मिळवण्यासाठी धावपळ करावी लागते.बदलापूर स्थानकात सध्या नवीन आणि अधिक विस्तृत पादचारी पुलाचे बांधकाम सुरू आहे. फलाट क्रमांक तीनवर या पुलाचे आधारस्तंभ उभारले जात असून, त्यासोबत सरकते जिने देखील बसविण्यात येणार आहेत. मात्र, हे सर्व काम अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने प्रवाशांना दीर्घकाळ त्रास सहन करावा लागत आहे. रेल्वे प्रशासनाने ठेकेदाराला डिसेंबर महिन्यापर्यंत काम पूर्ण करण्याची अंतिम मुदत दिल्याचे समजते.




स्थानकावर तात्पुरती शेड उभारण्यात आलेली नाही. त्यामुळे भर पावसात प्रवासी छत्र्या घेऊन उभे राहतात, पावसाचे पाणी फलाटावर साचते आणि प्रवाशांना घसरून पडण्याचा धोका निर्माण होतो. फलाटावरील अनेक ठिकाणी खड्डे पडले असून, ते देखील अपघातास आमंत्रण देत आहेत.

एकीकडे स्थानकाचा होम प्लॅटफॉर्म असूनही फलाट क्रमांक एक प्रवाशांसाठी बंद ठेवण्यात आला आहे. त्यामुळे लोकल आल्यानंतर प्रवाशांना होम प्लॅटफॉर्मवरच दोन्ही बाजूंनी चढ–उतार करावी लागते. परिणामी, गोंधळाची व अपघाताची शक्यता वाढली आहे.दोन वर्षे उलटूनही काम पूर्ण होत नसल्यामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर तात्पुरत्या शेडची उभारणी तातडीने करावी, तसेच स्थानकावरील कामाला गती द्यावी, अशी ठाम मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

## शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीवरील त्रुटी तात्काळ दूर करा–युवासेनेची तहसीलदारांकडे मागणी


**मी आपले सरकार केंद्रावरून फार्मर आयडीसाठी नोंदणी केली होती. त्या वेळी नोंदणी यशस्वी झाली असा संदेश प्राप्त झाला. मात्र आता शेततळ्यासाठी अर्ज करताना माझा आयडी अद्याप प्रलंबित दाखवला जात आहे. उद्या अर्जाची अंतिम तारीख असून, माझ्या नुकसानीस जबाबदार कोण?**
**– सुरेश शिंदे, शेतकरी, शेलगाव**

**सोलापूर | प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमध्ये तांत्रिक त्रुटी असल्यामुळे शासनाच्या विविध कृषी योजना, पीक विमा व अनुदान यांचा लाभ घेणे अडचणीचे झाले आहे. त्यामुळे तात्काळ या त्रुटी दूर करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या युवासेनेचे तालुकाप्रमुख शंभूराजे फरतडे यांनी तहसीलदार यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनाच्या प्रती कृषी मंत्री, महसूल मंत्री तसेच जिल्हाधिकाऱ्यांना इमेलद्वारे पाठविण्यात आल्या आहेत. निवेदनात युवासेनेने स्पष्ट केले आहे की, शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकरी ओळखपत्र (फार्मर आयडी) सक्तीचे करण्यात आले आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी हे ओळखपत्र तयार करून त्याची नोंदणी देखील पूर्ण केली. मात्र, नोंदणी यशस्वी झाल्याचा संदेश प्राप्त होऊनही फार्मर आयडी प्रणालीमध्ये अद्याप प्रलंबित (पेंडिंग) दाखवले जात आहे. यामुळे शेतकऱ्यांना योजना व अनुदानासाठी अर्ज करता येत नाही.

या त्रुटींमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असून, वेळेवर अर्ज सादर न झाल्याने योजनांपासून वंचित राहावे लागत आहे. शेतकऱ्यांना याबाबत योग्य मार्गदर्शन करून त्यांची ओळखपत्रे तातडीने मंजूर व्हावीत, यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी शंभूराजे फरतडे यांनी केली. या निवेदनावर सुरेश शिंदे, अविनाश गाडे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांच्या सह्या आहेत.



### फार्मर आयडी म्हणजे काय?

**फार्मर आयडी म्हणजे शेतकऱ्यांचे अधिकृत ओळखपत्र. याच्या आधारे शेतकऱ्यांना पीक विमा, कृषी कर्ज, विविध शासकीय अनुदाने व लाभ मिळवता येतात. सध्या अनेक कृषी योजनांसाठी फार्मर आयडी सक्तीचा आहे. त्यामुळे ओळखपत्र प्रलंबित राहिल्यास शेतकरी योजनांपासून वंचित राहू शकतात.**

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .